माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील
## अपील क्रमांक : २५८३/२०२४

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. गोपीनाथ कवडुजी भगत, ५३, जयभिम को. ऑप. हौ. सोसायटी, चंद्रमनी नगर, नागपूर-४४००२७ | मुख्यालय सहाय्यक, उपअधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर (ग्रामीण), नागपूर | उपअधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर (ग्रामीण), नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १५.०६.२०२६**

**१. उपस्थिती —**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित |

**२. व्दितीय अपील अर्ज —**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०४.१०.२०२४

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०४.१०.२०२४

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : एकतर्फी सुनावणी घेवून कोणतीही माहिती दिली नाही

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जोडपत्र-अ नुसार संपूर्ण माहिती देण्यात यावी.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०८.०७.२०२४

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ११.०७.२०२४

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन एप्रिल -२०२३ ते एप्रिल-२०२४

(४)जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : “ (१) श्री. रामाजी भिवाजी पाटील (२) ऋषी भिवाजी पाटील यांचा प.ह. नं. १०८, १०९ बनवाडी तालुका ग्रामीण यांची जमीन मोजणी केली असल्यास चार दिक्षा शेतकऱ्यास व शेत मालकास नोटीस पाठविल्याबाबत, नोटीसचे छायांकित प्रती साक्षांकित करुन देण्यात यावी” असे नमूद करुन माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

४. **प्रथम अपील** –

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १२.०८.२०२४

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १३.०८.२०२४

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : आदेश मिळाला नाही

(४)अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १२.०९.२०२४ रोजी सुनावणी घेवून "(१) अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. (२) जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती पुरविण्यात आली आहे" असे नमूद करुन दिनांक १७.०९.२०२४ रोजी आदेश पारीत केले.

५. **युक्तीवाद/लेखी खुलासा** – आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे आयोगास ऐकून घेता आले नाही.

सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री. तेजेंद्रकुमार नंदेश्वर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, भूमि अभिलेख, ब्रम्हपूरी, श्री. मोहन गोरखा तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर (ग्रामीण), नागपूर, श्री. सतिश हं. पवार यांनी स्पष्ट केले की, अपिलकर्ता यांनी मोजणीची प्रत मागितलेली होती. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार सदर माहितीचा शोध घेवून अपिलार्थीस मागितलेली माहिती पुरविण्यात आली आहे.

६. **निष्कर्ष :**– अपिलकर्ता, श्री. गोपीनाथ कवडुजी भगत यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उपअधिक्षक भूमी अभिलेख, नागपूर (ग्रामीण), नागपूर यांच्याकडे माहितीसाठी जोडपत्र-अ दाखल केला होता. त्यांच्या या अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार पुर्तता करुन अपिलार्थीस मागितलेली माहिती दिनांक १७.०९.२०२४ रोजी पुरविण्यात आली आहे, असे आयोगास उपस्थित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले.

कोणतीही माहिती दिली नाही, असे कारण नमूद करीत अपिलार्थी, श्री. गोपीनाथ भगत यांनी आयोगाकडे दिनांक ०४.१०.२०२४ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते. त्यांच्या या द्वितीय अपील अर्जावर आज दिनांक १५.०६.२०२६ रोजी सुनावणी आयोजित केली असता, ते स्वत: आयोगास कोणतीही पूर्व सूचना न देता गैरहजर राहीले. त्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

असे असले तरीही जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मांडलेली बाजू व आयोगासमक्ष दाखविलेले दस्ताऐवज विचारात घेता, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढणे अपेक्षीत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : १५.०६.२०२६

जावक क्रमांक 4832 दिनांक 7 JUL 2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर